KALPA-TARU
POWER TRANSMISSION LIMITED

| | | | |
|---|---|---|---|
| | | **Date** | 30-12-2023 |
| **HeadLine:** | KPIL secures new orders worth Rs 3,244 crore | | |
| **Newspaper:** | Sakal | **Language:** | Marathi |
| **Journalist:** | | **Edition:** | Mumbai, Pune |
| **Page No.** | 5 **Position:** Centre | **Height:** | 12 **Column:** 1 |

# 'कल्पतरू प्रोजेक्ट्स'ला मोठी कंत्राटे

**मुंबई :** कल्पतरू प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लि. (केपीआयएल) या देशातील सर्वांत मोठ्या, नोंदणीकृत इंजिनियरिंग आणि बांधकाम कंपन्यांपैकी एका कंपनीने आपल्या संयुक्त भागिदारी (जेव्ही) आणि आंतरराष्ट्रीय उपकंपन्यांसह ३२४४ कोटी रुपयांची नवी कंत्राटे मिळवली आहेत. बिल्डिंग्ज अँड फॅक्टरीज व्यवसायासाठी 'केपीआयएल'ला आतापर्यंतचे सर्वांत मोठे डिझाइन आणि बांधकामाचे कंत्राट मिळाले असून, त्यामध्ये दक्षिण भारतातील मोठ्या निवासी प्रकल्पाच्या बांधकामाचा समावेश आहे. अंदाजे १३ दशलक्ष चौरस फूट बिल्ड-अप एरिया असलेल्या या प्रकल्पाचे काम एका प्रतिष्ठित डेव्हलपरकडून मिळाले आहे. तसेच भूमिगत मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे डिझाइन व बांधकामाचे कंत्राट मिळाले असून, त्यामुळे केपीआयएल टीबीएम टनेलिंग कामासह इलेक्ट्रिक वाहतूक क्षेत्रात प्रवेश करत आहे. परदेशी बाजारपेठांमधून ट्रान्समिशन आणि वितरण (टी अँड डी) व्यवसायासाठीदेखील कंपनीला कंत्राट मिळाले आहे, असे 'केपीआयएल'चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनिष मोहनोत यांनी म्हटले आहे.

radar

Business Critical Information